# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर-४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दूरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००

संकेतस्थळ : http:su.digitaluniversity.ac.in ई-मेल : registrar@sus.ac.in bos@sus.ac.in

NAAC Accredited-2022 'B ++' Grade (CGPA 2.96)



**अभ्यासमंडळे विभाग**


जा.क्र.:पुअहोसोविसो/अमंवि/२०२२/6897

दिनांक: - 3 SEP 2022

प्रति

१) **मा. प्राचार्य/प्राचार्या,** सर्व संलग्नित महाविद्यालये

२) **मा. संचालक/संचालिका,** विद्यापीठ परिसर सर्व शैक्षणिक संकुले
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**विषय: आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये/वरिष्ठ महाविद्यालयामध्ये स्काऊट ॲन्ड गाईड चे वर्ग सुरु करणे बाबत..**

संदर्भ : १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचा दि.१८/११/२०२१ रोजीचा शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र.१०७/विशि-५.

२) मा. विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांचे दि.१८/०७/२०२२ रोजीचे पत्र जा.क्र. विससं/उशि/सोविसो/२०२१/१९६५.

३) मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग यांचे पत्र क्र. विससं/उशि/सोविसो/२०२२/१३६८ दि.१८/०७/२०२२.

४) सोलापूर जिल्हा सचिव, महाराष्ट्र राज्य, हिंदुस्थान स्काऊट ॲण्ड गाईड्स यांचे जा.क्र. HSG/SO/01/2022 दिनांक २९/०६/२०२२ रोजीचे पत्र.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. २ ते ४ नुसार आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयामध्ये नमूद प्रमाणे हिंदुस्थान स्काऊट ॲन्ड गाईड रेंजर व रोवर युनिटचे उपक्रम आपल्या महाविद्यालयात/संकुलात राबवावे व त्याचा अहवाल मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग यांना दर सहा माहीस सादर करावा.

आपला विश्वासू,

प्र.कुलसचिव

सोबत: संदर्भ क्र. १ ते ४ च्या प्रती.

प्रत : १) मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर.

२) मा. सोलापूर जिल्हा सचिव, महाराष्ट्र राज्य, हिंदुस्थान स्काऊट ॲण्ड गाईड्स, सोलापूर.

पवि/०१

# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर

ड विभाग, तळ मजला, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर ४१३ ००१
E-mail: jtdirhesol@rediffmail.com

जा.क्र. : विससं/उशि/सोविसो/२०२२/1368 दिनांक : १८/७/२०२२

**प्रति,**

कुलसचिव
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विदयापीठ,
सोलापूर.

विषय : स्काऊट अँड गाईड्सचे शिक्षण सुरु करणेबाब्रत
संदर्भ : मा.तहसिलदार (सर्वसाधारण), जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांचे पत्र क्र. २०२१/साशा/संकीर्ण/२ ब/आरआर-८३२, दि.१/७/२०२२

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भांकीत पत्र व त्यासोबतचे सचिव, सोलापूर जिल्हा, महाराष्ट्र राज्य, हिंदुस्थान स्काऊट अँड गाईड यांच्या दि.२१/६/२०२२ रोजीच्या पत्राची प्रत व त्यासोबतच्या सहपत्राची प्रत यासोबत जोडली आहे. सदर पत्रान्वये देण्यात आलेल्या सुचनांनुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ.अशोक उबाळे)
विभागीय सहसंचालक (उ.शि.)
सोलापूर विभाग, सोलापूर.

B.O.S. / A.R. &D

Punyashlok Ahilyadevi Holkar
Solapur University, Solapur
22 JUL 2022
Inward No. 218
Date

BOS

Punyashlok Ahilyadevi Holkar
Solapur University, Solapur
Inward No. 1074
Date 26/07/2022
Section

(02)

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर

(सामान्य शाखा : संकीर्ण -२ ब )

सिध्देश्वर पेठ, सोलापूर- पिनकोड ४१३ ००३

दूरध्वनीक्र.०२१७-२७३१०२०

ईमेल-tahsildargadsolapur@gmail.com

क्र. २०२१/साशा/संकीर्ण/२ब /आरआर- ८३२

दिनांक ०१ / ०७ /२०२२

प्रति,

१. मा. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण)
सोलापूर विभाग सोलापूर

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक ) जि. प. सोलापूर

३. प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ),
सोलापूर महानगरपालिका सोलापूर

विभागीय सहसंचालक (उ.शि.)
सोलापूर विभाग सोलापूर
कार्यालय- 1974 आ.क्र.
7 JUL 2022

**विषय** :- स्काऊट अँड गाईड्सचे शिक्षण सुरु करणेबाबत.

**संदर्भ** :- सचिव, सोलापूर जिल्हा, महाराष्ट्र राज्य, हिंदुस्थान स्काऊट अँड गाईड यांचेकडील पत्र क्र HSG/SO/०१/२०२२ दि. २१/०६/२०२२

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविणेत येते की, सचिव, सोलापूर जिल्हा, महाराष्ट्र राज्य, हिंदुस्थान स्काऊट अँड गाईड्स सोलापूर यांनी, हिंदुस्थान स्काऊट्स अँड गाईड्स संस्था ही युवा व खेळ मंत्रालय भारत सरकार यांच्याकडून देशात स्काऊटींग व गाईडचे कार्य करण्यास मान्यता मिळालेली संस्था आहे. युवकांचा भविष्याचा पाया महाविद्यालयीन जीवनात दिशा घेत असतो. त्यांना योग्य शिक्षणासोबत सामाजिक, शारिरीक, बौध्दीक विकासासाठी आवश्यक असे मंच उत्तम भविष्यासाठी सहाय्य करु शकतो म्हणून स्काऊटींग व गार्डडचे शिक्षण महत्वपूर्ण मानले जाते. या शिक्षणाचा प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांस जिल्हा पुरस्कार, राज्य पुरस्कार, राष्ट्रपती पुरस्कारासाठी पात्र होतो. उच्च महाविद्यालयात परीक्षेतील गुणामध्ये ५ ते १२ टक्के पर्यंत सवलत मिळते. तसेच इतर शासकीय भरतीमध्ये संधी मिळते. तसेच विशेषत: रेल्वे उच्च पदस्थ भरतीमध्ये राखीव कोटा ठेवला जातो त्यास प्रथम प्राधान्य दिले जात असल्याने शाळा, विद्यालय, महाविद्यालय, उच्च महाविद्यालयात तसेच इतर शैक्षणिक क्षेत्रामध्ये स्काऊट अँड गाईडचे शिक्षण सुरु करण्यात यावे असे विनंती केली आहे.

तरी संदर्भाधिन पत्र व त्यासोबतचे सहपत्र पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडून पाठविणेत येत आहे.

पृ.१ ते २९

(अंजली कुलकर्णी)
तहसिलदार (सर्वसाधारण)
जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर

प्रत :- सौ. रुपाली सुनिल बोबे सचिव, सोलापूर जिल्हा, महाराष्ट्र राज्य, हिंदुस्थान स्काऊट अँड गाईड, मध्यवर्ती कार्यालय- शिवपार्वती, ३५ कित्तूर चन्नम्मा नगर, विजयपूर रोड सोलापूर - ४१३ ००४ यांना माहितीस्तव

भारत सरकार मान्यतेने (S-33939-ord.No.F-20/99-IV) महाराष्ट्र राज्य (Regd under S.R.Act-XXI-1860 Reg.No.S-MH-17234)

# हिंदुस्थान स्काउटस् अँड गाईडस्

मध्यवर्ती कार्यालय : शिवपार्वती ३५ कित्तुर चनम्मा नगर,विजापूर रोड. सोलापूर - ४१३ ००४
विभागीय कार्यालय : कोणार्क प्राइड बिल्डिंग, ४/५/५ केसरकर पेठ. सातारा - ४१५ ००२
उस्मानाबाद,सोलापूर,लातूर जिल्हा कार्यालय : ०३ काळे बिल्डिंग, बालाजी नगर, उमरगा ता.उमरगा जिल्हा.उस्मानाबाद - ४१३ ६०६
E-mail id - hsgsolapur.mah@gmail.com [ www : https://hsgmaharashtra.org / www : https://hsgindia.org ]

| श्री.नरसिंग मेंगजी | श्री.गोपाळराव डोंगरे | श्री.मुनीर पटटणकुडे | सौ.रुपाली सुनील बोबे |
|---|---|---|---|
| State Chief Commissioner. | State Chief Secretary & Admin Officer | Divisional Officer | District Secretary |

जा. क्र. HSG/SO/01/2022 दिनांक-29/06/2022

प्रती,
**मा. जिल्हाधिकारी साहेब**
**जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर**

GB
pl. issue letter to Solapur University requesting all colleges to cooperate. copy to applr
स्काऊटस् अँड गाईडस् Reg. No. S-33939 Ord No. F-20/99/IV महाराष्ट्र राज्य
29/06/2022

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती करण्यात येते की, **हिंदुस्थान स्काऊटस् अँड गाईडस्** संस्था ही युवा व खेळ मंत्रालय भारत सरकार यांच्याकडून संपूर्ण देशात स्काऊटींग व गाईड चे कार्य करण्यास मान्यता मिळालेली संस्था आहे. भारत देश हा युवकांचा देश म्हणून ओळखला जातो. आपली युवाशक्ती विशाल अद्भुत वः ऊर्जावान असून देशाला दिशा देण्याचे कार्य करु शकते. युवकांच्या भविष्याचा पाया महाविद्यालयीन जीवनात दिशा घेत असतो. हीच ती वेळ जेव्हा आपण त्यांना योग्य शिक्षणासोबत सामाजिक, शारीरिक बौद्धिक विकासासाठी आवश्यक असे मंच उत्तम भविष्यासाठी सहाय्य करू शकतो. म्हणूनच स्काऊटींग व गाईडचे शिक्षण महत्वपूर्ण मानले जाते.

या शिक्षणाचा फायदा प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास होतो. तो जिल्हा **पुरस्कार, राज्य पुरस्कार व राष्ट्रपती पुरस्कारसाठी** पात्र होतो. त्याचप्रमाणे उच्च महाविद्यालयात परीक्षेतील गुणामध्ये 5 ते 12 टक्के पर्यंत सवलत मिळते. इतर शासकीय भरतीप्रक्रिये मध्ये संधी मिळते. तसेच विशेषतः रेल्वे उच्च पदस्थ भरतीमध्ये राखीव कोटा ठेवला जातो त्यास प्रथम प्राधान्य दिले जाते.

स्काऊटिंगच्या शिक्षणामध्ये युवकांना / युवतींना / मुला-मुलींना स्वावलंबनाचे धडे दिले जातात. येणाऱ्या संकटावर मात कशी करता येईल याचे ज्ञान दिले जाते, त्या सोबतच स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले जाते. जेणे करून याचा सर्व फायदा युवक / युवतींना होतो. हा सर्व अभ्यासक्रम **हिंदुस्थान स्काऊटस् अँड गाईडस्** मध्ये शिकवले जाते. यासाठी परिपूर्ण ज्ञान असणारी **स्काऊट मास्टर व गाईड कॅप्टन** या शिक्षकांची फळी निर्माण केलेली आहे.

तरी, आपल्या जिल्ह्यातील सर्व शाळेमध्ये / विध्यालयात / महाविद्यालयात / उच्च महाविद्यालयात व ईतर शाळेमध्ये स्काऊट अँड गाईडचे शिक्षण सुरू करण्यात यावे, ह्या प्रशिक्षणास वेळोवेळी आपले मार्गदशन आणि सहकार्य मिळावे. ही नम्र विनंती.

**सोबतः**

1. शासन मान्यता पत्राची प्रत.
2. महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय प्रत.
3. देशभरामध्ये राज्यपाल यांनी दिलेल्या संदेशाची प्रत.
4. स्काऊटींग चा अभ्यासक्रम प्रत.

832 29/1 01/07/22

Bobe
सोलापूर जिल्हा सचिव
महाराष्ट्र राज्य
हिंदुस्थान स्काऊटस् अॅण्ड गाईडस्

भारत सरकार मान्यतेन (S-33939-ord.No.F-20/99-IV) महाराष्ट्र राज्य (Regd under S.R.Act-XXI-1860 Reg.No.S-MH-17

# हिंदुस्थान स्काउटस् अँड गाईडस्


मध्यवर्ती कार्यालय : शिवपार्वती ३५ कित्तुर चनम्मा नगर,विजापूर रोड. सोलापूर - ४१३ ००४
विभागीय कार्यालय : कोणार्क प्राइड बिल्डिंग, ४/५/५ केसरकर पेठ. सातारा - ४१५ ००२
उस्मानाबाद,सोलापूर,लातूर जिल्हा कार्यालय : ०३ काळे बिल्डिंग, बालाजी नगर, उमरगा ता.उमरगा जिल्हा.उस्मानाबाद - ४१३ ६०६
E-mail id - hsgsolapur.mah@gmail.com [ www : https:/ /hsgmaharashtra.org / www : https:/ /hsgindia.org ]

श्री.नरसिंग मेंगजी State Chief Commissioner. | श्री.गोपाळराव डोंगरे State Chief Secretary & Admin Officer | श्री.मुनीर पटटणकुडे Divisional Officer | सौ.रुपाली सुनील बो District Secretary


जा. क्र. HSG/SO/13 /2022

दिनांक- 22/ 08/202

हिंदुस्थान स्काऊटस् अँड गाईडस् Reg. No. S-33939 Ord No. F-20/99/IV महाराष्ट्र राज्य

**प्रती,**
**मा. प्राचार्य साहेब**
मा. कुलसचिव साहेब
पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ सोलापूर.

**विषय**:- आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये / वरिष्ठ महाविद्यालयामध्ये स्काऊट अँड गाईड चे वर्ग सुरू करणे बाबत...

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती करण्यात येते की, **हिंदुस्थान स्काऊटस् अँड गाईडस्** संस्था ही युवा व खेळ मंत्रालय भारत सरकार यांच्याकडून संपूर्ण देशात स्काऊटींग व गाईड चे कार्य करण्यास मान्यता मिळालेली संस्था आहे. भारत देश हा युवकांचा देश म्हणून ओळखला जातो. आपली युवाशक्ती विशाल अद्भुत व ऊर्जावान असून देशाला दिशा देण्याचे कार्य करु शकते. युवकांच्या भविष्याचा पाया महाविद्यालयीन जीवनात दिशा घेत असतो. हीच ती वेळ जेव्हा आपण त्यांना योग्य शिक्षणासोबत सामाजिक, शारीरिक बौद्धिक विकासासाठी आवश्यक असे मंच उत्तम भविष्यासाठी सहाय्य करू शकतो. म्हणूनच स्काऊटींग व गाईडचे शिक्षण महत्वपूर्ण मानले जाते.

या शिक्षणाचा फायदा प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास होतो. तो **जिल्हा पुरस्कार, राज्य पुरस्कार व राष्ट्रपती पुरस्कारसाठी** पात्र होतो. त्याचप्रमाणे उच्च महाविद्यालयात परीक्षेतील गुणामध्ये 5 ते 12 टक्के पर्यंत सवलत मिळते. इतर शासकीय भरतीप्रक्रिये मध्ये संधी मिळते. तसेच विशेषतः रेल्वे उच्च पदस्थ भरतीमध्ये राखीव कोटा ठेवला जातो त्यास प्रथम प्राधान्य दिले जाते.

स्काऊटिंगच्या शिक्षणामध्ये युवकांना / युवतींना / मुला-मुलींना स्वावलंबनाचे धडे दिले जातात. येणाऱ्या संकटावर मात कशी करता येईल याचे ज्ञान दिले जाते, त्या सोबतच स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले जाते. जेणे करून याचा सर्व फायदा युवक / युवतींना होतो. हा सर्व अभ्यासक्रम **हिंदुस्थान स्काऊटस् अँड गाईडस्** मध्ये शिकवले जाते. यासाठी परिपूर्ण ज्ञान असणारी **स्काऊट मास्टर व गाईड कॅप्टन** या शिक्षकांची फळी निर्माण केलेली आहे.

तरी, आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये / वरिष्ठ महाविद्यालयामध्ये स्काऊट अँड गाईडचे शिक्षण सुरु करण्यात यावे ही नम्र विनंती.

B.O.S.
23/08/2022


Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
22 AUG 2022
Inward No. 2719
Date ..........


**सोबतः**

1. शासन मान्यता पत्राची प्रत.
2. महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय प्रत.
3. स्काऊटींग चा अभ्यासक्रम प्रत.
4. सभासद नोंदणी शुल्क प्रत.

सोलापूर जिल्हा सचिव
महाराष्ट्र राज्य
हिंदुस्थान स्काऊटस् अँड गाईडस्
मो. 7028185686/9850390533

०१

**हिंदुस्थान स्काऊट ॲण्ड गाईड संस्थेचे विना आर्थिक सहाय्य स्वरुपातील महाराष्ट्रातील वरिष्ठ महाविद्यालयांत ऐच्छिक स्वरुपात रेंजर आणि रोवर युनिटचे उपक्रम राबविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण २०२१/प्र.क्र.१०७ /विशि-५**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- १८ नोव्हेंबर , २०२१

<u>संदर्भ</u> : - संचालक, उच्च व तंत्रशिक्षण संचालनालय, पुणे यांची दिनांक २२/१०/२०२१ तसेच दिनांक ११/११/२०२१ रोजीची पत्रे

**<u>प्रस्तावना</u>:**

भारत देश हा युवकांचा देश म्हणून ओळखला जातो. आपली युवाशक्ती विशाल अदभुत व ऊर्जावान असून देशाला दिशा देण्याचे कार्य करु शकते. आजची युवाशक्ती आपल्या मायभूमीचे भविष्य असून प्रत्येक सामाजिक संस्था व्यक्तिसमूह या नात्याने आपल्याला युवकांची ऊर्जा सकारात्मक दिशेने प्रवाहित झाली पाहिजे. म्हणून प्रत्येक युवक कटिबध्द असला पाहिजे. युवकांच्या भविष्याचा पाया महाविद्यालयीन जीवनात दिशा घेत असतो. हीच ती वेळ जेव्हा आपण त्यांना योग्य शिक्षणासोबत सामाजिक शारिरीक व बौध्दिक विकासासाठी आवश्यक असे मंच उत्तम भविष्यासाठी सहाय्य करु शकतो.

"हिंदुस्थान स्काऊट ॲन्ड गाईड" संस्था ही युवा व खेळ मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून संपूर्ण देशात स्काऊटिंग व गाईडसचे कार्य करण्यास मान्यता मिळालेली संस्था आहे. हिंदुस्थान स्काऊट ॲन्ड गाईड या संस्थेचे रेंजर व रोवर युनिटचे उपक्रम उच्च शिक्षण विभागातील सर्व महाविद्यालयात राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>** -

हिंदुस्थान स्काऊट ॲन्ड गाईड रेंजर व रोवर युनिटचे उपक्रम, उच्च शिक्षण विभागातील सर्व महाविद्यालयात ऐच्छिक स्वरुपात विना आर्थिक सहाय्य तत्वावर राबविण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे.

<u>अटी व शर्ती</u> -

१. उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय / अशासकीय अनुदानित व कायम विनाअनुदानित स्वयंअर्थसहाय्यित महाविद्यालये व अकृषि विद्यापीठे यांना हा उपक्रम ऐच्छिक राहील.

२. सदर उपक्रमास शासनावर कोणताही आर्थिक व प्रशासकीय भार येणार नाही ( विना आर्थिक सहाय्य तत्वावर ) या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

३. महाविद्यालयामधील शैक्षणिक वेळापत्रकाशिवाय अन्य वेळेत / कालावधीत सदर उपक्रम राबविण्यात यावा.

४. सदर उपक्रमाचा अहवाल संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना दर सहामाहीस सादर करण्यात यावा.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२१११९८१६१४४३११०८ असा आहे. सदरहू शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT MADHUKARRAO BAWISKAR

Digitally signed by AJIT MADHUKARRAO BAWISKAR
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=HIGHER AND TECHNICAL DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=880d8eb755bcb4455fa360baaa8797820b6265d75275a72f9fa31977bfeff4c9, serialNumber=99eb928028df71ebdfcd2898e209d499192ad3899261fead42f7d38a3141ab69, cn=AJIT MADHUKARRAO BAWISKAR
Date: 2021.11.18 16:16:27 +05'30'

(अजित बाविस्कर)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, मलबार हिल मुंबई

२.मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

३.मा.मंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

४.मा. राज्यमंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

५. स्वीय सहाय्यक, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

६. संचालक, उच्च व तंत्रशिक्षण संचालनालय, पुणे

७. सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण

८.सर्व कुलसचिव, अकृषी विद्यापीठे

९. स्वीय सहाय्यक सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०. अध्यक्ष / सचिव, हिंदुस्थान स्काऊटस ॲण्ड गाईडस, शास्त्री वार्ड, पंचायत समिति कॉलनी, गोंदिया , महाराष्ट्र राज्य -४४१ ६०१.

11

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे- ४११ ००१


Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९/२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३


क्र.:स्काऊट-गाईड/१४२१/प्र.क्र.०५/मवि-१/२०२१/५३८० दिनांक- /११/२०२१

26 NOV 2021

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य.

विषय: हिंदूस्थान स्काऊट अॅण्ड गाईड संस्थेला महाराष्ट्र राज्यात विना आर्थिक सहाय्य वरिष्ठ महाविद्यालयात रेंजर आणि रोवर युनिट चे उपक्रम राबविण्याची परवानगी मिळण्याबाबत..

संदर्भ:१. शासन निर्णय क्र.: संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१०७/विशि-५ दि. १८.११.२०२१

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, हिंदुस्थान स्काऊट अॅण्ड गाईड संस्थेचे विना आर्थिक सहाय्य स्वरुपातील, महाराष्ट्रातील वरिष्ठ महाविद्यालयात ऐच्छिक स्वरुपात रेंजर आणि रोवर युनिटचे उपक्रम राबविण्याबाबत संदर्भांकित शासन निर्णय निर्गत झालेला आहे. या शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेऊन कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिनस्त सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन सूचित करण्यात यावे. केलेली कार्यवाही संचालनालयास अवगत करण्यात यावी.

(डॉ. प्रकाश बच्छाव)
शिक्षण सहसंचालक,
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.

प्रत: राज्य सचिव, हिंदुस्तान स्काउट्स अॅण्ड गाईडस् - शास्त्री वार्ड, पंचायत समिती कॉलनी, गोंदीया- ४४१६०१ यांना माहितीस्तव अग्रेषित.

12

# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर

ड विभाग, तळ मजला, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर ४१३ ००१

E-mail: jtdirhesol@rediffmail.com

जा.क्र. : शिससं/उशि/सोवि/२०२१/1965 दिनांक : 30/11/२०२१

प्रति,

प्राचार्य,

सर्व अशासकीय कला, वाणिज्य,

विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये, सोलापूर विभाग

विषय : हिंदुस्थान स्काऊट ॲण्ड गाईड संस्थेला महाराष्ट्र राज्यात विना आर्थिक सहाय्यक वरिष्ठ महाविदयालयात रेंजर आणि रोवर युनिटचे उपक्रम राबविण्याची परवानगी मिळण्याबाबत...

संदर्भ : संचालनालयाकडील पत्र क्र.स्काऊट/गाईड/१४२१/प्र.क्र.०५/मवि-१/२०२१/१३७८० दि.२६ नोव्हेंबर २०२१

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भांकीत पत्राची प्रत यासोबत जोडली असून सदर पत्रान्वये देण्यात आलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ.अशोक उबाळे)
विभागीय सहसंचालक (उ.शि.)
सोलापूर विभाग, सोलापूर.

प्रत - मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

F. No. 46-5/2015-NPYAD
**Government of India**
**Ministry of Youth Affairs and Sports**
**Department of Youth Affairs**
****

13

Shastri Bhawan, New Delhi
Dated: the 13th Jun, 2016

To,
Chief Secretary,
All States/UTs

**Sub: Illegal use of name of Ministry of Youth Affairs & Sports by "The Scouts/Guides Organization"**

Sir/Madam,

I am directed to refer to the subject mentioned above and to inform that Ministry of Youth Affairs and Sports has neither given any recognition or affiliation to "The Scouts/Guides Organization" nor giving grant-in-aid to conduct scouting and guiding activities in any state/UT of the country. The organization is also not an autonomous body under the Ministry of Youth Affairs as being claimed in their letterhead/banners/posters. It has come to the notice of this Ministry that " The Scouts/Guides Organization" having its headquarters at 4- B Mahalaxmi Squire, Sector 12, Vasundhara, Ghaziabad (UP) 201012 is misusing the name of Ministry of Youth Affairs & Sports, Govt of India in their letter head stating that it is affiliated with the Ministry of Youth Affairs & Sports. The Organization has also sought application for various posts for appointment in their Regional Office, Nagpur in Local Newspaper namely "Lokmat , Nagpur Edition" dated 14/05/2016 misusing the name of Ministry of Youth Affairs & Sports, Govt of India by stating that it is affiliated with the Ministry. You are requested to take strict action agaisnt " The Scouts/Guides Organization" for any acts of misrepresentation being done by them in your State/UT.

2. It is further informed that Ministry of Youth Affairs & Sports has granted recognition and is giving financial assistance to only two Scouts and Guides Non-Government Organizations namely **(i) Bharat Scout & Guides and (ii) Hindustan Scouts & Guides** to promote scouting and guiding activities in the country. All concerned may be informed accordingly.

Yours faithfully,

(S K Pandey)
Under Secretary to the Govt of India
Tel: 23386580
Email: sudhanshu@nic.in

# स्काऊट अँड गाईड चा अभ्यासक्रम

1) शावक बुलबुल 2) स्काऊट गाईड 3) रोवर / रेंजर

| अ.क्र. | तपशील | वर्गवारी |
|---|---|---|
| १ | शावक / बुलबुल | १ली ते ५वी पर्यंत |
| २ | स्कॉऊट / गाईड | ६वी ते १०वी पर्यंत |
| 3 | रोवेर / रेंजर | ११वी ते १५वी पर्यंत |

## १) शावक बुलबुल-अभ्यासक्रम :

| अ.क्र. | तपशील | वर्गवारी |
|---|---|---|
| १ | प्रवेशिका | ३ महीने |
| २ | रजत किरण | ६ महिने |
| ३ | स्वर्ण किरण | ६ महिने |
| ४ | हिरक किरण | ९ महीने |
| ५ | राज्य पुरस्कार | ७ महीने |

## २) स्कॉऊट गाईड-अभ्यासक्रम :

| अ.क्र. | तपशील | वर्गवारी |
|---|---|---|
| १ | प्रवेशिका | ३ महीने |
| २ | रजत/ कोमल पॅड | ३ महीने |
| ३ | स्वर्ण ध्रुवपद | ३ महीने |
| ४ | राज्य पुरस्कार | ३ महीने |
| ५ | राष्ट्रपति पुरस्कार | ३ महीने |
| ६ | - | अतिरिक्त प्रवीणता बॅच |

## 3) रोवर/ रेंजर-अभ्यासक्रम :

| अ.क्र. | तपशील | वर्गवारी |
|---|---|---|
| १ | इच्छुक (गुंतवणूक केलेले) | ३ महीने |
| २ | प्रवेशिका रोवर/ रेंजर | ३ महीने |
| ३ | रजत सितारा | ६ महीने |
| ४ | स्वर्ण सितारा | ९ महीने |
| ५ | हिरक सितारा | १२ महीने |
| ६ | अध्यक्ष रोवर/रेंजर पुरस्कार | १२ महीने |
| ७ | - | सदस्य म्हणून १० वर्ष |

**परेड, थांगता, सेल्फ डिफेन्स, योग व प्राणायाम, कवायत व मनोरे, आग आणि सुरक्षा (फायर अँड सेफ्टी)**

## स्काऊट अँड गाईड चे फायदे-

सदर चा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या युवकास/ युवतीस रेल्वे भरतीमध्ये प्राधान्य दिले जाते, तसेच स्काऊट मास्टर / गाईड कॅप्टन ही पदवी मिळवून ते राष्ट्रपती पुरस्कार व राज्य पुरस्कारासाठी पात्र होतात. पुढील उच्च शिक्षणामध्ये प्रवेश घेत असताना 5% राखीव जागा दिली जाते.

## BENEFITS OF SCOUTS AND GUIDES :

After successful completion of the course students will be awarded by Rajya Puraskar & Rashtriya Puraskar with certificates. All certificate holders will get 5% quota (reservations) in college addmission, central govt jobs and state govt jobs. Presently some central govt organizations like Indian Railway, Public Sector Undertakings, etc and various state govt. departments have recruited man powers under reserved category of scouts and guides.

## OUR TRAININGS & PROGRAMMES :

01) Pared.

02) Cub & Bulbul Section.

03) Scouts and Guides Section.

04) Rover & Ranger Section.

05) Scout Master-Teacher Training Programme (for Boy's Unit).

06) Guide Caption-Teacher Training Programme (for Girl's Unit).

07) Fire & Safety Management. 08) First Aid. 09) Self Defense.

10) Karate. 11) Camping. 12) Meditation & Yoga.

## शुल्क तपशील

| अ.क्र. | तपशील | शुल्क |
|---|---|---|
| 1 | 1 ली ते 4 थी वार्षिक सभासद नोंदणी शुल्क | 100 रु/-. |
| 2 | 1 ली ते 4 थी दोन दिवसीय अनिवासी इंटर डोजो कॅम्प शुल्क | 200 रु/-. |
| 3 | 5 वी ते 7 वी वार्षिक सभासद नोंदणी शुल्क | 100 रु/-. |
| 4 | 5 वी ते 7 वी दोन दिवसीय अनिवासी इंटर डोजो कॅम्प शुल्क | 200 रु/-. |
| 5 | 8 वी ते 10 वी वार्षिक सभासद नोंदणी शुल्क | 100 रु/-. |
| 6 | 8 वी ते 10 वी दोन दिवसीय अनिवासी इंटर डोजो कॅम्प शुल्क | 200 रु/-. |
| 7 | 11 वी ते 15 वी वार्षिक सभासद नोंदणी शुल्क | 100 रु/-. |
| 8 | 11 वी ते 15 वी दोन दिवसीय अनिवासी इंटर डोजो कॅम्प शुल्क | 200 रु/-. |
| 9 | प्रती वर्षी निवासी 5 दिवसीय कॅम्प | 2500 रु/-. |